साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * मंगळवार, दि. ०९ एप्रिल २०२४ * पाने-४ ₹ २/- www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.




गुढी पाडवा व नुतन वर्षाच्या सर्वांना
**हार्दिक शुभेच्छा!**
- सा.परळी परिसर परिवार.

## एक गुढी उभारू स्नेह, आपुलकी आणि विश्वासाची - ना.धनंजय मुंडे

### गुढीपाडव्याच्या ना.मुंडेंच्या जिल्हावासीयांना शुभेच्छा!

परळी वैजनाथ (बातमीदार):- एकीकडे राज्यात व विशेषकरून आपल्या बीड जिल्ह्यात दुष्काळ सदृश परिस्थिती आहे. या परिस्थितीत हिंदू धर्मातील अत्यंत महत्वाचा, साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला गुढी पाडव्याचा सण आपण साजरा करत आहोत, त्यात सर्वत्र लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत. अशात सणाच्या उत्साहाबरोबरच आपले स्नेह बंध जोपासत, सर्वांप्रति आपुलकी व विश्वास निर्माण करणारी एक गुढी यंदा उभारू; अशा शब्दात राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा वासीयांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

चैत्र शुद्ध प्रतिपदा, अर्थात साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला गुढी पाडव्याचा आज सण आहे. आनंद, स्नेह, आपुलकी वृद्धिंगत करणारा व सामाजिक ऐक्याची जपणूक करणारा हा सण साजरा करताना सर्वांनाच त्यात संमिलीत करून घेऊ, असा संदेश धनंजय मुंडे यांनी दिला आहे.

दरम्यान, गुढीपाडव्याच्या नंतर दोनच दिवसात रमजान ईदचेही पर्व सबंध जगभरात मुस्लिम समाज साजरे करणार आहे, तेव्हा सामाजिक सलोखा व बंधुभाव जपण्याची ही दुहेरी संधी असल्याचेही धनंजय मुंडे यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. ***

## धनराज आदोडे यांची सहाय्यक संशोधन अधिकारी पदी निवड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील शारदा नगर भागातील रहिवासी असलेल्या धनराज मारोती आदोडे यांची अर्थ व सांख्यिकी विभाग वतिने घेण्यात आलेल्या परिक्षेत सहाय्यक संशोधन अधिकारी गट ब (अराजपत्रित) म्हणुन निवड करण्यात आली असुन त्यांच्याकडे अर्थ व सांख्यिकी विभाग देण्यात आला आहे.धनराज यांच्या या निवडीने परळीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



परळी शहरातील शारदानगर भागातील रहिवासी मारोती आदोडे यांचे चिरंजीव धनराज आदोडे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण परळी येथे पुर्ण झाले. महाविद्यालयीन शिक्षणानंतर आदोडे यांनी स्पर्धा परिक्षेची तयारी सुरु केली. या परिक्षेत त्यांना घवघवीत यश मिळाल्यानंतर त्यांची राज्य उत्पादन शुल्क आयुक्तालय मुंबई येथे सहाय्यक संशोधन अधिकारी गट ब (अराजपत्रित) म्हणुन नियुक्ती करण्यात आली. त्यांच्याकडे अर्थ व सांख्यिकी विभागाचा कारभार देण्यात आला आहे. सामान्य परिस्थितीतुन आपार मेहनत, जिद्द व चिकाटीने धनराज आदोडे यांनी शिक्षण घेत स्पर्धा परिक्षेची यशाला गवसनी घातली. त्यांचे हे यश परळीतील सामान्य कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्या व स्पर्धा परिक्षेची तयारी करणार्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारे आहे. आदोडे यांच्या या निवडीचे परळीतील सर्व क्षेत्रातील मान्यवर व मित्र परिवाराच्या वतिने कौतुक करण्यात येत आहे. ***

## दुष्काळजन्य परिस्थितीत पिण्याचे पाणी, चारा, ऊसतोड मजुरांना रेशन यांसह आवश्यक उपाययोजना तातडीने कार्यान्वित करा-ना.धनंजय मुंडे

बीड (बातमीदार):- लोकसभेची निवडणूक, प्रचार आणि जबाबदारी अशी रणधुमाळी असली तरीही बीड जिल्हा वासीयांचे हित प्राधान्य क्रम असल्याने बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सध्याच्या दुष्काळजन्य परिस्थितीत पिण्याच्या पाण्यासह आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी मागणी बीड जिल्हा प्रशासनाकडे केली आहेत.



निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने प्रशासन स्तरावर बैठका घेण्यास मर्यादा असल्याने पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दुष्काळ उपाययोजनांबाबत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क करून चर्चा केली. पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर मंजूर करण्यात आलेले टँकर्स कमी पडत असल्यास लोकसंख्येच्या प्रमाणात टँकर्सची संख्या किंवा खेपा वाढवाव्यात. पाण्याचे स्रोत उपलब्ध नसलेल्या ठिकाणी नव्याने बोअरवेल घेणे, उपलब्ध तलावातील पिण्यासाठी राखीव पाणी, अतिरिक्त पाणी उपलब्ध असलेल्या तलावातील पाणी टप्प्याने शेतीसाठी सोडणे, तसेच जनावरांच्या चाऱ्याचा दर आठवड्याला आढावा घेतला जावा, याबाबतही पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हाधिकारी यांना विनंती केली आहे.

जिल्ह्यातील ऊसतोड मजूर ऊसतोडणी हंगाम संपवून परत आलेले आहेत, त्यांना रेशन उपलब्ध करून देणे त्याचबरोबर त्यांना तसेच अन्य शेतमजुरांना हाताला काम मिळावे यासाठी मनरेगा अंतर्गत मंजूर करण्यात आलेली कामे आचार संहितेच्या आधीन राहून राबवावीत, याबाबतही धनंजय मुंडे यांनी मागणी केली आहे. ***

## जहाजावरून बेपत्ता; परळी तालुक्यातील युवकाच्या शोधासाठी मुंडे बंधू-भगिनींचे पीएमओ व परराष्ट्र मंत्रालयाकडे मदतीसाठी प्रयत्न

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी तालुक्यातील इंजेगावचा युवक सिंगापूर-इंडोनेशिया दरम्यान जहाजातून बेपत्ता झाल्याच्या घटनेने त्याचे कुटुंबचिंतग्रस्त बनले आहे. सर्वच प्रसार माध्यमांमध्ये प्राधान्याने ही बातमी प्रसारित झाली असून कराड कुटुंबाला प्रणव चा शोध घेण्यासाठी मदत व्हावी या दृष्टीने सर्व स्तरातून प्रयत्न केले जात आहेत. या अनुषंगाने राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे व भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी प्रधानमंत्री कार्यालय, परराष्ट्र मंत्रालय आदी संबंधित ठिकाणी पाठपुरावा सुरू केलेला आहे. प्रणव कराडचा शोध घेण्यासाठी मदतीचे आवाहन त्यांनी ट्विट करून केले आहे.

सध्या पुण्यात राहत असलेला मात्र मुळ परळी वैजनाथ तालुक्यातील इंजेगावचा प्रणव कराड नावाचा तरुण जहाजावरून बेपत्ता झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली. हा तरुण मर्चंट नेव्हीमध्ये एका कंपनीच्या जहाजावर काम करत होता. मात्र आता तो अचानक बेपत्ता झाल्याची माहिती प्रणवच्या कुटुंबियांना देण्यात आली आहे. या सगळ्या प्रकारामुळे प्रणवचे कुटुंबीय फार चिंतेत आहेत.तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी कंपनीकडून



माहितीसाठी समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची खंत चिंताग्रस्त असलेल्या कराड कुटुंबियांनी व्यक्त केली होती.विल्हेम्सन शिप मॅनेजमेंट प्रायवेट लिमिटेड या कंपनीत प्रणव काम करत होता. कंपनीच्या जहाजावर प्रणव डेट कॅडेट म्हणून काम करायचा. गेल्या तीन दिवसांपासून प्रणव बेपत्ता असल्याचं त्याच्या वडिलांनी सांगितलं आहे. मुंबईतल्या कंपनीने प्रणवचा शोध सुरू केला आहे. मात्र प्रणव बेपत्ता असल्याची माहिती दिल्यानंतर आतापर्यंत मुंबईतील कंपनीने कोणतीही समाधानकारक माहिती दिलेली नाही, असं त्याचे वडिल गोपाळ कराड यांनी सांगितले.सर्वच प्रसार माध्यमांमध्ये प्राधान्याने ही बातमी प्रसारित झाली असुन प्रणव कराडचा शोध लागावा व या कुटुंबाला मदत व्हावी यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न सुरु झाले आहेत. या अनुषंगानेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी काल ही माहिती मिळाल्यापासूनच प्रयत्न सुरू केले असुन प्रणवचा शोध घेण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांशी ते पाठपुरावा करत आहेत. त्याचबरोबर पीएमओ, परराष्ट्र मंत्रालय आदी संबंधितांचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी याबाबत मदतीसाठी ट्विट केले आहे. त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनीही कालपासूनच कराड कुटुंबीयांच्या मदतीसाठी संपूर्ण माहिती घेऊन पी एम ओ व परराष्ट्र मंत्रालय आणि संबंधित यंत्रणांची या कुटुंबाला मदत मिळण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून त्यांनीही ट्विट करून संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान या संबंधित यंत्रणा, संबंधित कंपनी व पोलीस आदींकडून सुरुवातीला प्रणव कराडचा शोध घेण्याबाबत तितकासा प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र सर्व प्रसारमाध्यमांतून पुढे आलेला हा मुद्दा आणि आता धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांनी या प्रश्नात लक्ष घातल्याने संबंधित यंत्रणा सक्रिय होऊन लवकरच प्रणव कराडच्या बाबतीत शोधाबाबतची सकारात्मक माहिती समोर येईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ***

## लेंडेवाडीत भीषण पाणीटंचाई; ग्रामस्थांचे हाल!

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी तालुक्यातील लेंडेवाडी या गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून पिण्याच्या पाण्यासाठी गावकऱ्यांना जीवनमरणाची लढाई करावी लागत असल्याचे चित्र आहे. पाण्यासाठी डोंगर पार करून दरीच्या बाजूने असलेल्या रस्त्यावरून घागरी घेऊन ये जा करावी लागत आहे. पाय घसरला तर दरीत पडून मरण्याची वेळ घोटभर पाण्यासाठी या नागरिकांवर आली आहे. याबाबत पंचायत समितीकडे सातत्याने पाठपुरावा करूनही अद्याप या गावाला पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले नसल्याची खंत या गावचे सरपंच व गावकरी व्यक्त करत आहेत.

परळी तालुक्यातील लेडेवाडी हे एक छोटंसं गाव आहे. गावाला दोन महिन्यापासून पाण्याची कसलीही सोय नाही. गावाच्या शिवारा शेजारी असलेले अंबलटेक व चांदापूर चे तळे आटले असून या गावच्या ग्रामस्थांना कसरत करत आटलेल्या तळ्यात असलेल्या एका विहिरीत उतरुन तांब्या ने पाणी घागरीत भरून आणावे लागत आहे.मागील दोन महिन्यांपासून ग्रामस्थ पंचायत समिती मध्ये पाणी पुरवठ्यासाठी पाठपुरावा करत असून प्रशासन या गावाच्या पाणी प्रश्नाकडे साफ दुर्लक्ष करतांना दिसत आहे. प्रशासनाने तात्काळ याकडे लक्ष देत पाणी टँकर द्वारे गावास पाणी पुरवठा सुरु करावा अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

लेंडेवाडी गावकऱ्यांना घोटभर पिण्याच्या पाण्यासाठी डोंगर पार करावा लागतो. दरीच्या बाजूने असलेल्या रस्त्यावरून वयोवृद्ध, लहान मुले यांना ये जा करावी लागत आहे. पाण्याच्या घागरी घेऊन जाता येता पाय घसरला तर दरीत पडून मरण्याची मोठी भीती आहे. लेंडेवाडी (ता.परळी) गावच्या नागरिकांचा गेल्या दोन महिन्यांपासून प्रशासनासमोर आर्त टाहो सुरु आहे.मात्र अद्यापही प्रशासन उदासीन असल्याचे चित्र आहे. ***

# निवडणुकीसह दुष्काळ निवारणाची कामेही करावी: जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी

बीड (जीमाका):- निवडणुकीसह दुष्काळ निवारणाचे कामे ही करावी असे निर्देश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी माजलगाव येथील आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना दिले.

३९ बीड मतदार संघातील २२९माजलगाव विधानसभा मतदार संघा ची पाहणी आज जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली. यावेळी त्यांनी घेतलेल्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या बैठकीस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार वर्षा मनाळे तसेच सर्वच विभागातील कार्यालयीन प्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात पाणीटंचाईची असून नीट व्यवस्थापन करून पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना कमी पोहोचतील अशी व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. माजलगाव धरणाला



भेट देऊन इथली प्रत्यक्ष परिस्थिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाणून घेतली. तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाचे नीट नियोजन करावे आणि मागील त्याला काम मिळेल असे व्यवस्थापन करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माजलगाव विधानसभा मतदारसंघातील स्ट्राँग रूम ही मुलींची शासकीय वस्तीगृह येथे तयार करण्यात आले असून या ठिकाणची ची पाहणी करून सुरक्षात्मक उपायांची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. माजलगाव तहसील कार्यालयात निवडणुकी संदर्भात वेगवेगळे कक्ष स्थापन झाले असून या कक्षांना यावेळी त्यांनी भेटी दिल्या तसेच जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक साहित्याची तपासणीही केली. ३९ - बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव येथील सादोळा रोड केसापुरी कॅम्प येथील निगराणी पथकाची (SST) पाहणी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली. ****

# शहागड गोदावरी पात्रात सापडली पुरातन क्रूड तोफ

गेवराई (बातमीदार):- राष्ट्रीय महामार्ग ५२ च्या जुन्या पुलाखाली नागझरी - खामगाव गोदावरीनदी पात्रात दि.३ रोजी सायंकाळी गोदावरी नदीपात्रातील शेतकरी मोटर पाण्यात ढकलत असताना खड्ड्यामध्ये पुरातन प्रॅक्टिस राऊंड फायरगन गोदावरी नदी पात्रात पाणी कमी झाल्याने शेतकऱ्यांना मिसाइल आढळून आले ते जिवंत आहे की मृत आहे हे पाहण्याकरीता बॉम्ब स्कोड घटनास्थळी येत आहे.

सदर ठिकाणी सरपंच एड. नारायण शिंदे, महसूल विभागाचे कर्मचारी मंडळाधिकारी पखाले, खामगाव येथील सरपंच भाऊसाहेब डिगरे यांनी नागरिकांना पुरातन बॉम्बला कोणी हात लावू नये अशा सूचना दिल्यात. यावेळी



गेवराई पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी सदरील शस्त्र हे गेवराई पोलीस स्टेशन मध्ये जमा करण्यात आले असून बॉम्ब पथकाला रात्री पाचारण करण्यात आलेले असताना ते पुरातन व निष्काम असल्याचे तपास पथकाने संबंधित पोलिसांना यावेळी सांगितले. ***

# लग्न सराईच्या काळात बाल विवाह आटोपल्यास अजामीन पात्र गुन्हा : जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

बीड (जिमाका):- बीड जिल्ह्यात बाल विवाह निर्मूलन अभियान अतिशय कडकडीने राबविण्यात येत आहे. सध्या लग्नसराईचा काळा सुरू आहे. या कालावधीत बाल विवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ संपूर्ण राज्यात लागू आहे. त्यानुसार बाल विवाह आयोजित करणे हा अजामीन पात्र गुन्हा असून या काळात बाल विवाह लावल्यास कायदेशीर कार्यवाहीस समोरे जावे लागेल. त्यामुळे बाल विवाह होऊ न देणे हे समाजाच्या विकासासाठी चांगले असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुधीर ढाकणे यांनी पत्राव्दारे कळविले आहे.

बीड जिल्हयात बाल विवाह होवू नये म्हणून आवश्यक त्या उपाय योजना करणे सुरू आहेत. बाल विवाह हि प्रथा बाल हक्काच्या विरोधी असून बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार असे बाल विवाह बेकायदा ठरतात. या विरोधात गुन्हा नोंदविला जाणे अपेक्षित आहे. तसेच सदर कायद्याच्या अमलबजावणी संदर्भात महिला व बाल विकास विभागाच्या अधिसूचनेनुसार ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक, आणि शहरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. बीड जिल्हयातील संबधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिकार क्षेत्रात बाल विवाह होवू नये यासाठी प्रचार प्रसार, जागृती कार्यक्रम, प्रशिक्षण इत्यादी प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात.

बाल विवाह कायद्याने गुन्हा आहे. बाल विवाहाचे आयोजन करणे, साखरपुडा करणे, लग्नाची बोलणी करणे, किंवा बाल विवाहाला प्रोत्साहन भेटले अशी कोणतेही कृती करणे याकरिता वधु व वर यांचे आई वडील, मामा मामी, इतर नातेवाईक भटजी, मंडपवाले, सजावटवाले, फोटोग्राफर, पाणीवाले, आचारी, वऱ्हाडी मंडळी या सर्वावर बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ मधील कलम ९ व १० मधील तरतूदी प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात येतो.

सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने मंगल कार्यालय मालक / व्यवस्थापक, धार्मीक स्थळांचे व्यवस्थापक, यांनी वर (मुलगा) व वधू (मुलगी ) यांच्या वयाची खात्री शाळा सोडल्याचा दाखला किंवा निर्गम उताऱ्यावरुन करावी. असे आवाहन सुधीर ढाकणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बीड यांनी केले आहे. बाल विवाह होत असल्यास किंवा संकटग्रस्त बालकांसबंधी कोणतेही घटना लक्षात आल्यास त्याबाबत चाईल्ड लाईन बीड क्रं.१०९८ या टोल फ्री, क्रंमाकावर माहिती देण्यात यावी. माहिती देण्या-यांचे नांव गोपनीय ठेवण्यात येते. अधिक माहितीसाठी अश्विनी जगताप जिल्हा समन्वयक जिल्हास्तरीय चाईल्ड हेल्प लाईन कक्ष बीड, वरद प्राईड कॉम्प्लेक्स पहिला मजला धानोरा रोड बीड (Email-chlbeed2023gmail.com) या ठिकाणी संपर्क करण्यात यावा. ***

# गुजरातमधील दियोदर राजपरिवारातील सदस्य ज्योतिर्लिंग वैद्यनाथ चरणी नतमस्तक

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवी ज्योतिर्लिंग असलेल्या परळी वैजनाथ येथील प्रभू-वैद्यनाथाच्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक येत असतात. आज (दि. ५) रोजी गुजरात मधील दियोदर राजघराण्यातील सदस्यांनी सहकुटुंब येत पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले. परळी वैजनाथ येथे येऊन मनाला प्रसन्नता लाभल्याची प्रतिक्रिया वाघेला कुटुंबाने व्यक्त केली. गुजरात मधील दियोदर येथे स्वातंत्र्यपूर्व काळात वाघेला राजपूत घराणे यांची सत्ता होती. या संस्थानाला दियोदर संस्थान म्हणून ओळखले जाते. विशेष म्हणजे दियोदर हे पाकिस्तान बॉर्डरच्या अगदी जवळ आहे. दियोदर येथील राजघराण्यातील हे सदस्य पाकिस्तान बॉर्डरवरून परळीत आल्यानंतर प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनाने प्रसन्नतेची अनुभूती आम्ही घेत असल्याची त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. या राज परिवारातील मानसिंगजी वाघेला व त्यांचे कुटुंबीय आज परळी वैजनाथ येथे पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी आले होते. वाघेला कुटुंबीयांनी मनोभावे प्रभु वैद्यनाथाची पूजाअर्चा केली व दर्शन घेतले. यावेळी वैद्यनाथ देवल कमिटीचे विश्वस्त राजेश देशमुख यांनी त्यांचा सत्कार केला. दरम्यान दियोदर संस्थानाच्या राज घराण्याचा वारसा असलेल्या मानसिंगजी वाघेला यांनी गुजरात विधानसभेचे सभापती म्हणूनही काम केलेले आहे. त्याचप्रमाणे मानसिंगजी वाघेला यांच्या कन्या रुक्मणीजी या सध्या राजस्थान काँग्रेसच्या प्रमुख नेत्या म्हणून ओळखल्या जातात. या संपूर्ण परिवाराने आज प्रभु वैद्यनाथाचे दर्शन घेतले. बारा ज्योतिर्लिंग यात्रेतील पंचम ज्योतिर्लिंग प्रभु वैद्यनाथाचे स्पर्श दर्शन घेऊन मनाला अतिशय प्रसन्नता लाभल्याची प्रतिक्रिया त्यांनी यावेळी व्यक्त केली. ***

# पहिल्या मध्यावधी निवडणुकीचा रंजक इतिहास...

आज आपण तंत्रज्ञानाच्या युगात आहोत आणि या तंत्रज्ञानानं निवडणूक अतिशय कमी कालावधीत पार पडेल असे निश्चित केले आहे तरी आपल्या अखंडप्राय देशात यंदाची निवडणूक सात टप्प्यांमध्ये होत आहे. असे आहे तर पहिली मध्यवधी अर्थात पहिली लोकसभा निवडणूक कशी झाली असेल याचं साऱ्यांना कुतूहल असणार..!

देशाला १५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र्य प्राप्त झालं. त्यावेळी पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू झाले. पण ते भारतातील निवडणुकीतील निवडून आलेल्या पक्षांचे पंतप्रधान नव्हते. देश स्वतंत्र झाला त्यावेळी हैदराबाद, जुनागढ सारखी संस्थानं देशात अस्तित्वात होती. गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी नंतरच्या काळात ही संस्थानं भारतात विलीन करून घेतली.

एका बाजूला आपण देश एकसंघ करीत होतो तर दुसऱ्या बाजूला आपल्या संविधानाचे लिखाण सुरू झालेलं होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेत या संविधानाची निर्मिती झाली. हे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्विकृत झाले. यात आपल्या देशाची रचना सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताकाची निश्चित करण्यात आली. त्यानंतर पहिला प्रजासत्ताक दिन देशात २६ जानेवारी १९५० रोजी साजरा झाला. प्रजासत्ताकात त्यावेळी २५ राज्य होती. या सर्व राज्यात देशाचा कारभार चालविणाऱ्या संसदेचे प्रतिनिधी निवडावेत यातून पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीचा विचार झाल्यावर मार्च १९५० मध्ये निवडणूक आयोग स्थापन करण्यात आला व देशाचे पहिले मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून सुकुमार सेन यांची निवड झाली.

या नेमणुकीनंतर साधारण महिनाभराच्या कालावधीनंतर लोकप्रतिनिधित्व कायदा संसदेत संमत झाला. ज्यात निवडणूक घेण्याबाबतची तत्वे, आखणी आराखडा तरतुदी आदींचा समावेश होता. निवडणूक आयोगाने कामकाज सुरू केल्यानंतर १९५१ साली देशात जनगणना झाली आणि या जनगणनेला आधार मानून आता निवडणूक घ्यावे असा विचार पुढे आला. त्यात तरतुदीनुसार २५ राज्यांमधील ४०१ मतदारसंघांमधून ४८९ उमेदवारांची निवड होईल असा कार्यक्रम आखण्यात आला.

या ४०१ मतदार संघापैकी ३१४ मतदार संघातून प्रत्येकी एक तर ८६ मतदार संघामधून १ संघामधून एक सर्वसाधारण आणि एक अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती, या समाजाच्या संख्याबलानुसार असे दोन प्रतिनिधी निवडावेत व एक असा मतदारसंघ होता की ज्यातून तीन उमेदवार निवडण्याचे निश्चित झाले. या निवडणुकीसाठी सर्वात मोठे आव्हान अर्थातच अक्षर ओळख नसलेल्या किमान निम्म्या लोकसंख्येपर्यंत पोहोचणे आणि त्यांच्याकडून मतदान करून घेणे ,१९५१ साली झालेल्या जनगणनेनुसार देशाची लोकसंख्या ३६ कोटी १० लाख ८८ हजार ९० (जम्मू काश्मीर वगळता) इतकी होती. मतदार पात्रतेचे वय निश्चित करताना किमान २१ वर्षे पूर्ण झालेली व्यक्ती मतदार होती. त्यानुसार १७ कोटी ३२ लाख १२ हजार ३४३ मतदार यावेळी पात्र मतदार होते.

आज संगणक युगात मतदार यादी तयार करणे आणि याद्या प्रसिद्ध करणे सहज शक्य आहे मात्र संगणक नसलेल्या त्या काळात हे देखील एक आव्हान होते. मतदार याद्या तयार करण्यासाठी त्यावेळी तब्बल १६,५०० टंकलेखकांची (टायपिस्ट) नेमणूक करावी लागली. त्यांनी सलग सहा महिने काम केल्यानंतर या मतदार याद्या तयार झाल्या. मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी त्यावेळी ३ लाख ८० हजार रीम इतका कागद वापरावा लागला. (१ रीम साधारण अ-४ शिट्स व २.७ग्स.) यावरून त्याकाळी निवडणूक घेणे किती मोठे आव्हान होते याची केवळ पुसटशी कल्पना आपणास येऊ शकते. यंदाची निवडणूक ७ टप्प्यामध्ये होत आहे मात्र पहिली सार्वत्रिक निवडणूक ६८ टप्प्यांमध्ये घेण्यात आली होती. यासाठी १ लाख ९६ हजार ८४ मतदान केंद्राची स्थापना करण्यात आली होती. २८ ऑक्टोबर १९५१ ते २१ फेब्रुवारी १९५२ या कालावधीत ही निवडणूक झाली. यासाठी १ लाख ९६ हजार ८४ मतदान केंद्राची स्थापना करण्यात आली होती. त्यात २५,५२७ महिलांसाठी होते.

या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या ४४.९९ टक्के मते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला मिळाली त्यांचे ३६४ सभासद संसदेसाठी निवडले गेले.त्या खालोखाल १२ सदस्य समाजवादी पक्षाचे होते समाजवादी पक्षाला मिळालेल्या मतांची टक्केवारी १०.५९% इतकी होती तर साम्यवादी पक्षाला १६ जागांवर विजय मिळाला होता. मात्र त्यांच्या मतांची टक्केवारी केवळ ३.२९ टक्के इतकीच होती.

मतांची टक्केवारी आणि निवडून आलेल्या प्रतिनिधी यांचे प्रमाण व्यस्त वाटत असले तरी ते वास्तव आहे. यामुळे लोकशाहीत प्रत्येक मतदाराने आपल्या मतदानाच्या टप्प्याकडे गांभीर्याने बघितले पाहिजे व मतदान केले पाहिजे.

**– प्रशांत दैठणकर**

मो.९८२३१९९४६६

संपादकीय...

# नियोजनाचा अभाव....!

–० सुविचार ०–
वन है तो जल है, जल है तो कल है ।

२०१५ च्या तीव्र दुष्काळापेक्षाही यंदाचा दुष्काळ अधिक भयंकर आहे. २०१५ ला परळी तालुक्यात वार्षिक सरासरीच्या निम्मा पाऊस झाला होता. यंदा मात्र सरलेल्या पावसाळ्यात वार्षिक सरसरीच्या निम्माही पाऊस झाला नाही. परळी तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान साडेसातशे ते आठशे मिलीमीटर आहे. यंदा एक जून ते ३१ ऑक्टोबर या पावसाळ्याच्या पाच महिन्याच्या कालावधीत केवळ ३६९ मिलीमीटर एवढा अत्यल्प पाऊस परळी तालुक्यात झाला आहे. पडलेला हा पाऊस मागच्या पंचेवीस-तीस वर्षातील सर्वात कमी पाऊस आहे.

गेल्या पावसाळ्यात झालेल्या दमदार पावसामुळे तालुक्यातील छोट्या-मोठ्या प्रकल्पात व भूगर्भात जलसाठा टिकून होता. परंतु यंदाचा तीव्र उन्हाळा, मोठे तापमान, कमी झालेला पाऊस, होणारा उपसा यामुळे प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी झाला. तालुक्यातील बोरणा, बोधेगाव, चांदापूर, मोहा, हालम-हेळंब, खोडवा सावरगाव, मलनाथपूर येथील छोट्या-मोठ्या प्रकल्पातील पाणी साठ्याने तळ गाठला तर त्यातील बहुतेक प्रकल्प कोरडेठाक पडले आहेत. सरत्या पावसाळ्यात परळी शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या तालुक्यातील नागापूर येथील वाणगंगेवर बांधलेल्या 'वाण' प्रकल्पाच्या धारूर, अंबाजोगाई पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाल्याने 'वाण' प्रकल्पातील पाणीसाठा वाढला. सुमारे १९ दशलक्ष घनमीटर पाणीसाठवण क्षमता असलेल्या या प्रकल्पात यंदा हिवाळ्याच्या सुरूवातीला निम्म्यावर म्हणजे ६१ टक्के पाणीसाठा होता. यामुळे परळीकरांच्या पिण्याच्या पाण्याची मोठी चिंता दूर झाली.

'वाण' प्रकल्पातून दीड लाख लोकसंख्येच्या परळी शहरासह वाण प्रकल्पालगत असलेल्या विविध गावांना पाणी पुरवठा होतो. १९७३ साली या प्रकल्पातून परळी शहरासाठी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली. पुढे दोन वेळा येथून नवी पाणी पुरवठा योजना तयार केली गेली. परळी शहरास पालिकेमार्फत सध्या पाच दिवसाआड नळाला पाणीपुरवठा होतो. पालिकेच्या ढिसाळ नियोजनामुळे सध्या परळीकरांना अनेक भागात पुरेसे व वेळेवर पाणी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते आहे. पाच दिवसानंतर येणाऱ्या पाण्याचे वेळापत्रकच नाही. कोणत्याही वेळी नळाला पाणी येते. अनेक भागात नागरिक सकाळपासूनच पाण्याची वाट बघत असतात. कुठे सकाळी तर कुठे दुपारी तर कुठे रात्री नळाला पाणी येते. काही भागात नळाला विजेच्या मोटारी (पंप) लाऊनही पाणी येत नाही तर कुठे दोन वेळा पाणी सोडले जाते तर कुठे कितीवेळही पाणी चालू असते. यामुळे कुठ पाण्याचा ठणठणाट तर कुठे अपव्यय अशी परिस्थिती परळीत पाणी पुरवठ्याबाबत आहे. परळी पालिकेच्या ढिसाळ नियोजनामुळे शहरात ही परिस्थिती आहे. वाण प्रकल्पात मुबलक पाणीसाठा असूनही केवळ नियोजन नसल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो आहे.

परवा परळी पालिकेचे मुख्याधिकारी यांनी पाणी टंचाईचे संकट लक्षात घेता नागरिकांनीच खबरदारी घ्यावी, पाणी वाया घालवू नका, नळाला तोट्या बसवा, नळाला मोटारी लावू नका असे आवाहन केले आहे. नळाला मोटारी लावल्या शिवाय पाणी येते का? व ते पुरेसे मिळते का? हे अगोदर पालिकेने बघितले पाहिजे. नळाला मोटारी लावल्या तरच पाणी मिळते अशी परिस्थिती शहरात अनेक ठिकाणी आहे. पाण्याचा अपव्यय व्हायला नको, परंतु अपव्यय करणाऱ्यांवर पालिका प्रशासन काय कारवाई करते? हा प्रश्न आहे. शहरात सर्रास पाणी वाया घालवले जाते. जलवाहिन्या फुटल्यावर अनेक दिवस दुरूस्त केल्या जात नाहीत. बांधकामावर टाकाऊ पाणी टाकण्यापेक्षा नळाचे पाणी बेसुमार वापरले जाते. याकडे पालिका लक्ष देते का? पाणी टंचाईची व दुष्काळाची गंभीर परिस्थिती असताना परळी पालिकेचे कोणतेच नियोजन पाण्याच्याबाबत नाही याचे नागरिकांना आश्चर्य वाटते. ***

# जब हम जवाँ होंगे... मतदार होंगे..!



लहानपणी बघितलेली स्वप्नं पूर्ण करणं तारुण्यात आणि सज्ञान झाल्यावर आवश्यक असतं यात मतदार म्हणून हक्काचा स्वप्न पूर्ण झालेल्या प्रत्येकाने आपला हक्क देखील बजावला पाहिजे मतदान केलं पाहिजे.

एक गाणं खूप लोकप्रिय झालेलं त्यात मोठ्या स्वप्न रंजनाची गोष्ट होती जब हम जवाँ होंगे जाने कहा होंगे या स्वप्नरंजनात लहानपणी अनेक जण असतात आणि त्या वयात मोठा झाल्यावर काय करायचं याचं मनोनियोजन होत असत.

आपण आपली सामाजिक आणि आर्थिक स्थिती जाणून असतो आणि त्यावेळी असणाऱ्या आपल्याच वयाच्या मुलाप्रमाणे बाल सुलभ स्वप्न बघत असतो. बालमनाला नव्याची ओढ आणि कुतुहल मोठ्या प्रमाणावर असतं जे आपल्याला आज करू देत नाही ते करण्याची नैसर्गिक वृती आणि उर्मी मनात दौडत असते. मोठं झाल्यावर काय? पालक आपल्या परीने घरात डॉक्टर घडवायचा की इंजिनिअर असे आडाखे बांधत असतात पण बालमनाला वेगळीच ओढ असते एक मात्र खरं प्रत्येकाला मोठं व्हायचं आणि मोठेपणी काहीतरी करायचं नक्की असतं काही धुसर चित्र मनात असतात आणि ती पूर्ण करण्याचे प्रयत्न देखील याच वयात सुरु होतात.

मोठं झाल्यावर वाहन चालवण्याचा परवाना मिळवायचा हे अमेरिकन मुलांचं कायम स्वप्न असतं कारण वेगाचं वेड प्रत्येक ठाई असतं आणि त्यासाठी त्याची धडपड देखील असते आपल्याकडे देखील मुलांना असंच वाटतं पण आजची पिढी बघता असं म्हणता येईल की साऱ्यांना क्रिकेट आणि सोशल मिडियाने भारून ठेवले आणि जागोजागी याचा आपणास प्रत्यय येतो.

आयपीएलची मॅच म्हणजे पर्वणी सारं काही विसरून प्रत्येकाला क्रिकेट बघण्याची ओढ आणि क्रिकेटर होण्याचं वेड आहे. उरला वेळ मग इन्स्टा, फेसबुक यावर दिसणाऱ्या विश्वात रंगत नवीन स्वप्न बघायला वेळ राहत नाही. घरच्यांनी धोषा लावला म्हणून अगदी अपरिहार्यपणे अभ्यासाकडे वळणारे बहुसंख्य आहेत.

आपल्या देशाच्या या लोकशाही रचनेत आपण स्वत:ला आर्थिक आणि सामाजिक भान मिळायला पाहिजे हे त्या वयात जाणवत नाही बालकांचं आणि तरुणांचं ठिक आहे परंतु पालकांचं काय असा सवालही यानिमित्ताने उभा राहतो. आजची पिढीही उद्याचं भविष्य आहे आणि ते भविष्य आम्हाला घडवायचं आहे हे आपण नेहमी भाषणांमधून ऐकत आलो आहोत प्रत्यक्षात कृती मात्र होताना दिसत नाही.

एकाच वेळी एकोणिसाव्या आणि वीसाव्या आणि एकविसाव्या शतकात जगणारी पिढी असं योग्य वर्णन ठरेल आणि त्याच स्वरूपाची विसंगती प्रत्यक्षात आपणास दिसून येत आहे. हक्कासाठी भांडायचं आणि कर्तव्य टाळायचं असा विकासाचा मार्ग असू शकत नाही. देशासाठी तर नाहीच पण वैयक्तिक आयुष्यातही नाही.

मराठी संज्ञान, सुशिक्षित, सुसंस्कृत, संपन्न अनेक शब्द आहेत की जे व्यक्तींची ओळख करून देतात आणि त्यांचे व्यक्तिमत्व कसं आहे हे जगापुढे मांडतात. यात संज्ञानी एक संज्ञा आहे. शिक्षण घेतलं तो सुशिक्षित आहे पण सज्ञानि कोण? मुळात या शब्दाचा प्रत्यक्ष ज्ञानाशी संबंध नाही जगात जगण्या- वागण्याची रीत ज्याला कळाली तो सज्ञानी अशी सोपी व्याख्या करता येईल आणि आज हे सारं मांडायचं कारण अर्थात हाच सज्ञान वर्ग मतदार आहे आणि त्यांच्यावर नव्या देशाच्या भवितव्याची जबाबदारी आहे. आपल्याकडे पात्र मतदारांचे वय हे १८ करण्यात आलं त्यावेळी पासून या सगळ्या पिढीकडून नव्या नेतृत्वाला पुढे नेण्याची अपेक्षा आहे. राजकीय पातळीवर बऱ्याच घडामोडी होत असतात त्याचे योग्य व विश्लेषण करून या सर्वांनी मतदान करून लोकप्रतिनिधी निवडावा अशी अपेक्षा आहे. मुळात प्रबोधन करावे लागते ते मतदान करा करा.. करारे.. कारण ज्या मतदारांनी बदलत युग अनुभवला आहे आणि त्यांची मत आजच्या काळाच्या गतीशी जुळणारी आहेत अशा युवा पिढीवरच ही जबाबदारी अधिक आहे. त्यासाठी मतदानाचा दिवस सुट्टीचा दिवस किंवा आपल्या एका मताने किती फरक पडणार आहे अशी मानसिकता दूर करण्याची गरज आहे.

कोणता प्रतिनिधी आपल्या प्रश्नांना सोडवू शकतो आणि कोणत्या प्रतिनिधीत तितकी प्रगल्भता आहे हे मतदारांनी ठरवायचं आहे. निवडणूक म्हटलं की प्रचार हा आला परंतु प्रचारात दिली गेलेली वचने किंवा आश्वासने कितपत वास्तवाला धरून आहेत. त्याच्या पुर्ततेची किती शक्यता आहे याची तपासणी करून मतदान करावी ही देखील अपेक्षा आहे.

निवडणुकीला नकारात्मक पद्धतीनं न बघता जसं जब हम जवाँ होंगे. मतदार होंगे याची जाणीव ठेवावी कदाचित त्याचं स्वप्न पाहिलं नसेल परंतु या वयात हा अधिकार मिळालाय म्हणून जागरूक मतदार जरूर व्हा आणि आपण जबाबदारीने आपलं नाव मतदार यादीत आहे की नाही हे तपासून घेणे, मतदान केंद्राची माहिती घेणे तसेच सर्वाधिक महत्त्वाचा म्हणजे मतदानाच्या दिवशी मतदान करणे ही आपली जबाबदारी आहे. आपलं हे राष्ट्रीय कर्तव्य या सज्ञान झालेल्या पिढीने पार पाडलच पाहिजे ज्यामुळे लोकशाही अधिक मजबूत होईल.

**– प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड
चलभाषा क्र.९८२३१९९४६६

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०७ * अंक ५१ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) मंगळवार, दि. ०९ एप्रिल २०२४ * किंमत : २ रु.

# मराठी वर्ष शालिवाहन कालगणनेचे!


वर्ष सुरु होण्याचा दिवस अर्थात १ जानेवारी हे जगाच्या दृष्टीने नववर्ष आहे मात्र भारतीय परंपरेत विविध धर्मात वेगवेगळ्या दिवशी वर्ष सुरू होतं. यात मग मराठी पंचांगानुसार येणारं नववर्ष भारतात वैज्ञानिक आधार असणारं भारतीय सौर वर्ष तसेच इतर धर्मियांमध्ये इस्लाम तसेच पारसी नववर्षे आधी आपण बघतो आता वैश्विक रूपात कालगणना ही आर्थिक बाबींची झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कॅलेंडरचा स्वीकार करण्यात आला साधारण नववर्ष एक जानेवारी आहे.

सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न आणि हजारो वर्षांचा इतिहास असणारा आपल्या संस्कृती संपन्न देश यातही नानाविध धर्म यात सर्वमान्य पद्धती म्हणजे चंद्र आधारित कालगणना या कालगणनेत सहा ऋतू आणि १२ महिने यात विभागलेले आपले वर्षे आणि याची सुरुवात अर्थात चैत्र महिन्याच्या प्रतिपदेपासून म्हणजेच गुढीपाडव्यापासून होते. प्रतिपदा अर्थात महिन्याचा पहिला दिवस म्हणून पाडवा आणि पहिला महिन्याचा पहिला दिवस साजरा करताना व नव्या वर्षाचे स्वागत करताना गुढी उभारण्याची आपली परंपरा म्हणून हा गुढीपाडवा.

यंदा नववर्ष अर्थात गुढीपाडवा ९ एप्रिल रोजी येत्या मंगळवारी आहे. आपण शालिवाहन राजाने सुरू केलेले वर्ष गणना वापरतो वर्ष अर्थात शक-संवत्सर त्यानुसार ९ एप्रिल रोजी आपण गुढीपाडव्यापासून शालीवाहन शक १९४६ मध्ये प्रवेश करणार आहोत. याच सोबत देशात दिवाळीपासून नववर्षे साजरे करून कालगणना वापरली जाते ती गणना म्हणजे विक्रम संवत्सर होय. दोन महान पराक्रमी सम्राटांनी सुरू केलेल्या या कालगणना आहेत.

महाराष्ट्र आणि कोकणसह गोवा यात निसर्गाचं नातं सांगणारे सण आहेत. फाल्गुन महिन्यात रंगाचा सन रंगपंचमी त्या आधी होळीचा सण आणि त्यानंतरचे हे नववर्षाचे आगमन अर्थात चैत्रात वनराईत येणाऱ्या नव्या चैत्रपालवीच्या स्वागताचा उत्सव. निसर्गचक्राची जुळवून ठेवलेली ही सणांची परंपरा निसर्गातील मावळत्याचा उत्सव करते. त्याच उत्साहात नव्याचे स्वागत देखील करते त्या साऱ्यांचा मिलाप या कालावधीत आपणास दिसतो. सूर्य तळपत एका बाजूला अंगाची लाही-लाही करीत असताना निसर्ग मात्र आपली वाटचाल दमदारपणे वसंतऋतूत सुरू करीत असतो. पाना-फुलांच्या रूपाने होणारी रंगाची उधळण एक अनोखी रंगपंचमी सादर करते तर असमंताच्या रंगभूमीवर सूर्य चंद्र आणि मेघ यांचे एक विलक्षण वेधक नाट्य देखील हा काळ आपणास दाखवत असतो.

स्वतःची खास अशी खाद्य संस्कृती जपणाऱ्या या भागात वाढत जाणाऱ्या उन्हासोबत जुळवून घेताना उन्हाळी फळ आणि उन्हाळ्यात करायची बेगमीचा हा काळ यात 'बेगमी' हा शब्द खास कोकणचा



यापुढील ऋतू पावसाळ्याचा राहणार असल्याने त्या काळात मासेमारी बंद व झिम्माड पाऊस यामुळे घरात राहण्यासाठी वेगवेगळे खारवणाचे वाढलेले पदार्थ तयार करून ठेवणे म्हणजे 'बेगमी' होय.

साधारणपणे कालगणना बघितल्यास सर्वच कॅलेंडर हे साधारण २००० ते २१०० वर्षे जुने आहेत पण इतिहासाचा धांडोळा घेताना आपली संस्कृती त्याहीपेक्षा जुनी आहे. याचे पुरावे आपल्या आसपास असलेला ऐतिहासिक आणि भव्यदिव्य अशा वास्तूवरून देता येतात. कालगणना आपल्या दैनंदिन आयुष्यात काल आणि आज यातलं अंतर मोजण्याचे एक साधन आहेत. इतकचं याचं महत्त्व नाही तर त्याच्याशी निगडित जीवन संस्कृती आपण विकसित केली आहे. कालगणना एक प्रकारे संस्कृती स्थिरावल्याचं चिन्ह आहे. कोणी एकेकाळी जंगलामधून वस्ती करून राहणारा मनुष्यप्राणी नंतरच्या काळात गुंफामधून प्रथम टोळ्या आणि भटक्या समूहात रूपांतरित होत पाण्याकाठी स्थिरावला नदी आणि शेती यांच्या जोडीने शब्द-जाणीवा यामधून ग्राम आणि नगरांची रचना करून राहू लागला. त्या काळातच कला, क्रीडा आणि निगडित सांस्कृतिक गुणांचा परिचय घडला व यालाच जीवनशैलीचं रूप देताना निसर्गाशी नातं सांगत त्याने सण आणि उत्सव यांची नवी परंपरा सुरू केली. या साऱ्यांना काळाच्या पट्टीत बांधताना पुढे समाजाचे नेतृत्व करणाऱ्या राजे व सम्राटांनी आपापल्या कालगणना सुरू केलेल्या आहेत.

भिन्न वैचारिक मान्यता आणि त्याचा विस्तार यातुन याच काळात धर्माचे अवतरण झालं आणि त्या धर्म वर्चस्वाचा लढा आजवर जगात सर्वत्र उघड तर कुठे छुप्या पद्धतीने सुरू आहे पण यापेक्षा जीवन श्रेष्ठ आहे असे मानणारे मात्र या फदांत न पडता आपापल्या संस्कृतीत रमले आहेत हे देखील खरं. शालिवाहन शक तसं आपल्याला अधिक जवळचे आहे कारण सम्राट शालीवाहन हा याच भूमीतील सम्राट होय. शालेय प्रतिष्ठान नगरीचा राजा अर्थात ज्याला आपण पैठण म्हणून ओळखतो. सातवाहन वंशातील शालिवाहन राजाने आपल्या काळात या कालगणनेची सुरुवात केली. सातवाहन सम्राटांचा व वंशाचा कालावधी साधारण ३०० वर्षांचा असल्याची नोंद आहे. सातवाहन काळात देशात इतरत्र मातृसत्ताक पद्धती असली तरी सातवाहनांनी पितृसत्ताक पद्धतीचा अवलंब केला होता. त्यांच्या शासन काळात ब्राम्ही प्राकृत ही भाषा प्रचलनात होती. या साम्राज्याच्या काळातच आज विश्ववारसा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजिंठा आणि वेरूळ मधील लेण्या कोरण्यात आल्याची नोंद आहे. शालिवाहन सम्राटांनी आपल्या काळातील चलनासाठी चांदी, तांबे आदी धातूंच्या नाण्यांना प्रचलनात आणले. सर्वात महत्त्वाचा अर्थात स्वतःची स्वतंत्र कालगणना सुरू केली. त्यानुसार आपण आता चैत्र प्रतिपदेपासून नव्या वर्षाला सुरुवात करतो. हिंदू धर्मात वर्षभरात जे महत्त्वाचे साडेतीन मुहूर्त सांगितले आहेत. त्यातील एक आणि पहिला पूर्ण मुहार्ताचा दिवस म्हणजे गुढीपाडवा होय. नव संवत्सरासोबत गृहप्रवेश, वाहन खरेदी इतर साहित्य खरेदी व नव्याची मुहूर्तमेढ या दिवशी करण्याची परंपरा महाराष्ट्रात आहे.

**– प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड
चलभाषा क्र.९८२३१९९४६६

# जलव्यवस्थापन आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर...


**आपल्या देशाचे संविधान करते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य सर्वांनाच माहिती आहे. मात्र त्यांनी विविध जबाबदाऱ्या स्वीकारल्या त्या विविध क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान खूप महत्त्वाचं ठरतं. आपल्या देशात लोकशाही कशा पद्धतीची असावी आणि प्रत्येकाचे अधिकार आणि कर्तव्य निश्चित करण्याचे काम संविधानातून त्यांनी केले त्यांच्या इतकेच मोलाचे काम त्यांनी एक जलतज्ज्ञ या भूमिकेतून केले. यावेळी विषयातील तज्ज्ञ म्हणून त्यांनी दिलेले योगदान आजच्या काळात अतिशय आवश्यक ठरत आहे.**

आपला देश भौगोलिक दृष्ट्या पर्जन्याचा विचार करता मौसमी हवामानाच्या प्रदेशात येतो देशाची अर्थव्यवस्था मुख्यत: कृषी आधारित व्यवस्थेवर अवलंबून आहे आणि ही कृषी व्यवस्था चार महिन्यात पडणाऱ्या मौसमी पावसावर अवलंबून आहे. देशाचा भौगोलिक विस्तार खूप मोठा आहे त्यामुळे दक्षिणेकडून येणारा मोसमी पाऊस देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या काळात पोहोचतो त्यातीलच काही भाग प्रजन्य छाया क्षेत्रात आहेत.

पावसाच्या विषम प्रमाणामुळे आपल्या देशात एकाच वेळी काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य अर्थात कोरडा दुष्काळ तर काही भागात अतिवृष्टी झाल्याने पूरजन्य परिस्थिती असे चित्र सातत्याने आपण बघतो. एकाच काळात देशात काही भागात नागरिक पाण्यासाठी त्रस्त व काही भागात पाण्याने ग्रस्त असल्याचे हे चित्र दिसते. निसर्गावर नियंत्रण मिळवणं शक्य नाही. यातून निर्माण होणाऱ्या संकटावर मात करायची असेल तर पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि नियोजन हाच एकमेव पर्याय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाणले होते.

स्वतंत्र्य प्राप्ती पूर्वीपासून





म्हणजे व्हाईसरॉय समिती (मंजूर) सदस्य असल्यापासून त्यांनी जल व्यवस्थापनासाठी ब्रिटिश सरकारला आग्रहीपणे जल व्यवस्थापनाची मागणी केली होती. १९४३ मध्ये दामोदर नदीच्या भीषण अशा महापुराने झालेले नुकसान बघताना त्यांनी अमेरिकेतील टेनेसी प्रकल्पाप्रमाणे भारतातही पूर्ण यंत्रणासाठी धरण बांधून त्याचा वापर करण्याची मागणी केली. ब्रिटिश सरकारचे मुख्य अभियंता यांनी त्याच काळात इजिप्त मधील आस्वान धरण प्रकल्पावर काम केले होते. या ज्ञानाचा व त्या प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर भारतात व्हावा यासाठी डॉ आंबेडकरांनी प्रयत्न केले. नद्यांमधील पाण्याचे व्यवस्थापन करताना त्याचा विविध प्रकारे वापर शक्य आहे यात पूरनियंत्रण करण्यासोबतच जलविद्युत निर्मिती करणे आणि धरणाच्या कालव्यांमधून सिंचनाद्वारे कृषी क्षेत्रासाठी केला जावा अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली होती.

पुढे स्वतः या कामाची धुरा सांभाळताना त्यांनी दामोदर खोरे महामंडळ तसेच सोन नदी आणि महानदी नियोजनात मोलाचे कार्य उभे केले. ओरिसामध्ये हिराकुड धरण प्रकल्पाने केवळ पूरसमस्या संपवली असे नव्हे तर ऊर्जा निर्मितीसह सिंचनाचे उद्दिष्ट साध्य करून या भागाचा पूर्ण कायापालट केला असं म्हणता येईल. कोसी नदी, चंबल नदीबाबत देखील याच दृष्टिकोनातून काम करण्यात आले. केंद्र स्तरावरील पाणी धोरण असो अथवा जल ऊर्जा धोरण यातील डॉ. आंबेडकर यांचे कार्य अतुलनीय असेच आहे. पाणी धोरणानुसार आंतरराज्य पाणी वादात तोडगा काढणारा लवाद देखील तितकाच महत्त्वाचा आहे. आज ग्लोबल वॉर्मिंगच्या पार्श्वभूमीवर आधीच अनिश्चित असणाऱ्या मोसमी हवामानावर परिणाम झाला आहे. प्रजन्यवृष्टीचे प्रमाण आणि कालावधी यात झपाट्याने बदल होताना दिसत आहे. दुसऱ्या बाजूला ग्लोबल वॉर्मिंग कमी करण्यासाठी कार्बन उत्सर्जन कमी करण्याची वेळ आली त्यासाठी नैसर्गिक ऊर्जा पर्याय असणाऱ्या जलविद्युत निर्मितीचे महत्त्व आज अनन्यसाधारण बनले आहे. भारतासारख्या अविस्तीर्ण आणि कृषी आधारित अर्थव्यवस्थेसाठी जलव्यवस्थापन हाच प्रगतीचा मोठा मार्ग आहे आणि त्याबाबत डॉं बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार आणि संकल्पना व त्याबाबत केलेले कार्य अत्यंत आवश्यक आणि महत्वाचे ठरते. त्याची आवश्यकता दिवसागणिक जाणवते. अभ्यासू वृत्तीने प्रश्नांचे मूळ शोधून त्यांचे डॉं. आंबेडकर यांनी शोधलेले उत्तर त्यासाठीच मोलाचं आहे.

**– प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड
चलभाषा क्र.९८२३१९९४६६